


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७१ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । २४/०३/२०२६ । पाने - ४




# मंत्री देसाई यांना मारहाण, सातारा एसपी निलंबित




मुंबई (वृत्तसंस्था)

विधानपरिषदेचे कामकाज सुरू झाल्यानंतर सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत झालेल्या गोंधळावर प्रकाश टाकण्यात आला. यावेळी सातारा जिल्ह्याच्या पोलिस आधीक्षकांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली. तसेच पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सवाल उपस्थित केला की आम्ही सुरक्षित आहोत की नाही? सभागृहात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी सातारा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक तुषार दोषी यांच्या निलंबनाची मागणी लावून धरल्यानंतर सभापती नीलम गोऱ्हे यांनी निलंबनाचे निर्देश दिले आहेत. तसेच शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी सभागृहाच्या पायऱ्यांवर एसपींच्या निलंबनाच्या मागणीसाठी निदर्शने देखील केली.

आम्ही सुरक्षित आहोत की नाही? असा सवाल मंत्री शंभूराज देसाई यांनी उपस्थित केला. पोलिसांकडून आम्हाला धक्काबुक्की केली गेली. मला आज हे रेकॉर्डवर आणायचे आहे. १०० पोलिसांनी आम्हाला धक्काबुक्की केली. आम्ही कोणाकडे न्याय मागायचा? तो एसपी जो वागला आहे, एका घरगड्या सारखा वागला आहे. त्याची चौकशी लावा. हा अन्याय आम्ही सहन करणार नाही. मंत्र्यांवर अरेरावी करणाऱ्या त्या तुषार दोषींवर कारवाई करण्यात यावी अन निलंबित करण्यात यावे, अशी मागणी देसाई यांनी केली आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, शंभूराज देसाई यांनी जी काही घटना मांडली आहे, त्याचा मी देखील साक्षीदार आहे. या निवडणुकीची जेव्हा तारीख जाहीर झाली तेव्हा शंभूराज देसाई यांनी मला फोन केला होता. २ मतदार जे आहेत, त्यांच्यावर काही वर्षांपूर्वीचा गुन्हा काल दाखल केला आहे. त्यावर मी एसपी तुषार दोषी यांना विचारले आणि त्यांना सांगितले की मतदान आहे तर त्यांना मतदान करू द्या. मतदान करण्यापासून वंचित ठेऊ नका. मतदान झाल्यानंतर शहानिशा करा आणि कारवाई करा. त्यानंतर मी डीजी साहेबांना फोन केला आणि त्यांना सांगितले की मला जरा शंका आहे. हे मत कमी करण्यासाठी हे सगळे सुरू असल्याचे त्यांना सांगितले.

सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी जे काही झाले आहे, त्याची सखोल चौकशी केली जाईल आणि योग्य ती कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशोक खरातच्या संदर्भात जो विषय घडलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. या व्यक्तीने आपल्या तथाकथित शक्तींचा दुरुपयोग करून अनेक महिलांसोबत दुष्कृत्य केले आहे. या संदर्भातील कारवाई आपल्या पोलिसांनी केली आहे. याचा ट्रॅप तयार करून केली आहे. यात महिला देखील असल्याने त्या समोर यायला तयार नव्हत्या. त्यांची फसवणूक झाली आहे. त्यांना धीर दिल्यानंतर महिला तक्रारी करत आहेत. कारवाई जारी आत्ता झाली असली तरी तयारी आधीपासून सुरू होती.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपण नोटीस काढून ठेवली होती, त्याला बाहेर पळून जाता येणार नाही, अशी व्यवस्था करून ठेवली होती. हा महिलांच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे. आपल्याकडे वेगळ्या शक्ती असल्याचे भासवून महिलांची फसवणूक केली गेली.

### खरातला जे भेटले आहेत त्यांची एचआयव्ही टेस्ट करावी - वडेट्टीवार

**महाराष्ट्र कुठे चालला आहे? नाशिकचा जो कोणी भोंदू महाराज आहे. त्याला जे कोणी भेटले असतील त्या सगळ्यांची क्खत टेस्ट करून घ्यावी लागेल. नाहीतर सगळेच मारतील. या अशोक खरातचे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत. यात राजकीय क्षेत्रातील लोक, काही अधिकारी लोक आहेत त्याच सोबत यात काही महसूल विभागाचे अधिकारी आहेत. या सर्व जे जे भेटले आहेत त्या सगळ्यांचे सीडीआर तपासले पाहिजे. हा बाबा ओशोक जल बनवायचा त्यात तो व्हायग्रा टाकायचा. आणि मला नाव घ्यायला भाग पाडू नका. या माणसामुळे महाराष्ट्राची बदनामी झाली आहे.**

### मंत्र्याला मारहाण झाल्याचे कधी झाले आहे का? शंभूराज देसाई

**मतदान केल्यानंतर सदस्यांना ताब्यात घेता आले असते. मंत्र्याला मारहाण झाल्याचे कधी झाले आहे का? हे सभागृह निर्माण झाल्यापासून तुम्ही इतिहास बघा. धक्काबुक्की झाली आहे का? असे सवाल शंभूराज देसाई यांनी उपस्थित केले. सरकारमधल्या मंत्र्याला सरकारचे पोलिस इजा पोहोचवत असतील तर बोलायचे पण नाही? आम्ही न्याय कोणाकडे मागायचे? असेही त्यांनी विचारले.**

# तर्काला तिलांजली देऊन अजब तीर्थ पिणे हे भयंकर



मुंबई (वृत्तसंस्था)

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भोंदू अशोक खरात व त्याच्या नादी लागलेल्या राजकारण्यांवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारखे नेते व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात संवाद असायचा,. पण आज त्याच महाराष्ट्रातील नेते तर्काला तिलांजली देऊन कुठले तरी अजब तीर्थ प्राशन करण्यासाठी अशोक खरातसारख्याच्या भजनी लागतात हे भीषण आहे, असे ते म्हणालेत. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या सर्वांवर कारवाई करण्याची मागणीही राज यांनी केली आहे.

राज ठाकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, अशोक खरात प्रकरणातले हिडीस तपशील वाचून, शब्दशः गरगरल्यासारखं झालं. अवघ्या काही दिवसांपूर्वी १९ मार्च २०२६ ला आमच्या पक्षाच्या गुढी पाडवा मेळाव्यातून, महाराष्ट्राला किती सशक्त परंपरा लाभली आहे आणि या महाराष्ट्राने किती अद्वितीय माणसं या देशाला दिली आहेत याचं सादरीकरण केलं होतं. त्यात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते संत गाडगेबाबांपर्यंतचा ते अगदी आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे या सगळ्यांनी मराठी मनाची कशी मशागत केली हे दाखवलं होतं. आणि त्याच महाराष्ट्रात जेंव्हा अशोक खरातसारखा नीच माणूस, राजकारण्यांच्या आशीर्वादाने धुमाकूळ घालतो तेंव्हा खरंच, 'कुठे नेऊन ठेवला आहे महाराष्ट्र' हा प्रश्न पडतो.

# सजग नागरिक ही देशाची सर्वात मोठी शक्ती-अविनाश धर्माधिकारी

## माधवलाल मालपाणी स्मृती मंथन व्याख्यानमालेचा शानदार समारोप




संगमनेर (प्रतिनिधी)

'कायदे, नियम आणि नीतिमत्ता पाळून वागणारा प्रत्येक सजग नागरिक ही देशाची सर्वात मोठी शक्ती आहे. या जागरूक नागरिकांच्या संघशक्तीच्या बळावरच भारत विकसित होत असून विश्वातील एक महाशक्ती म्हणून उदयाला येत आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते माजी भारतीय प्रशासकीय अधिकारी आणि चाणक्य मंडलचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी येथे केले.

मालपाणी उद्योग समूहाचे अध्वर्यु स्व. माधवलालजी मालपाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ राजस्थान युवक मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मंथन व्याख्यानमालेतील तिसऱ्या व समारोपाच्या दिवशीचे व्याख्यान 'विकसित भारत आणि आपण सगळेच' या विषयावर संपन्न झाले. या व्याख्यानात आपले विचार मांडताना त्यांनी वरील प्रतिपादन केले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष आणि मालपाणी उद्योग समूहाचे संचालक मनीष मालपाणी, कार्याध्यक्ष सुमित अट्टल आणि कार्यकर्त्यांसह विविध श्रोते उपस्थित होते.

'भारत देशालाच देव मानून शुद्ध, पवित्र प्रामाणिक भावनेने कर्म करणारे शेतकरी, कामगार, समाजसेवक, शिक्षक, पत्रकार, डॉक्टर, वकील, अभियंते हे घटक म्हणजे राष्ट्राची खरी संपत्ती आहे. भारतीय जीवनपद्धती ला अध्यात्माचा पाया आहे. समर्थ रामदास स्वामींनी सांगितल्या प्रमाणे 'केल्याने होत आहे रे, तरी आधी केलेच पाहिजे' या उपदेशाप्रमाणे प्रत्येक सकारात्मक समाजसेवी कार्याची सुरुवात आपण स्वतःपासून केली पाहिजे. श्रीमद्भगवतगीतेत सांगितलेल्या कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, राजयोग हे राष्ट्राच्या उभारणीचे योग प्रयोग आहेत. त्याचा अंगीकार प्रत्येकाने केला पाहिजे' असे श्री. धर्माधिकारी म्हणाले. 'स्त्री आणि पुरुष हे राष्ट्राच्या प्रगती स्वरूप गरुडाचे दोन शक्तिमान पंख आहेत. या दोन्ही पंखांमध्ये जे बळ आहे त्या बळावरच आपण भरारी घेत आहोत. मात्र प्रगतीमध्ये सर्वात मोठा अडथळा जर कोणता असेल तर तो म्हणजे (पान २ वर)

# गॅस आता १४ ऐवजी ८ किलोचाच मिळणार ?



मुंबई (वृत्तसंस्था)


घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणात महत्वाचा बदल करण्याचे सरकारने ठरवले आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर नागरिकांना आता अर्ध्याच वजनाचा मिळणार आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर १४.२ किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येतो. मात्र आता हा घरगुती वापराचा गॅस ८ ते १० किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येणार आहे. सिलेंडर तोच राहणार आहे. मात्र त्यामध्ये गॅस आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्याचे आदेश गॅस कंपन्यांना देण्यात आलेत. जेवढा गॅस असेल तेवढे पैसे आकारले जाणार आहेत. युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या भरुन तयार असलेले १४.२ किलोचे सिलेंडर संपल्यानंतर नवीन सिलेंडर आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्यात येणार आहेत. यापुढे गॅस सिलेंडर कमी वजनाचे असल्याने ते साहजिकच कमी दिवस पुरणार आहेत. त्यामुळे सामान्य घरातील दैनंदिन गणित बिघडणार आहे. यावर सामान्य नागरिक कशाप्रकारे व्यक्त होणार, हे बघावे लागेल. याशिवाय, कमी वजनाच्या या घरगुती गॅस सिलेंडरची किंमत किती असणार, याकडेही सगळ्यांच्या नजरा आहेत.

इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल हे युद्ध दिवसेंदिवस चिघळताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इस्त्रायलने इराणमधील गॅस फिल्ड आणि खनिज तेलाचे साठे असलेल्या परिसरांमध्ये हवाई हल्ले केले आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने कतारमधील सर्वात मोठा नैसर्गिक वायूचा साठा असलेल्या परिसराला लक्ष्य केले आहे. यामुळे युद्ध संपल्यानंतरही या सुविधा पूर्ववत होण्यासाठी बराच वेळ जावा लागेल. त्यामुळे पुढील काही महिने जगभरात गॅसची टंचाई असेल, असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारने आवश्यक ती पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये एलपीजी गॅसच्या तुटवड्याच्या भीतीने नागरिकांनी अनेक ठिकाणी गॅस एजन्सीबाहेर रांगा लावल्याचे दिसून आले होते. सरकारने वारंवार आवाहन करुनही नागरिकांना घरगुती सिलेंडर मिळणार की नाही, याबाबत धास्ती कायम आहे. दरम्यान, गॅसच्या तुटवड्यामुळे सरकारने व्यावसायिक वापराच्या एलपीजीसाठी गॅस पुरवठा बंद केला होता. त्यामुळे हॉटेल इंडस्ट्रीवर गंडांतर ओढवले होते. मात्र, आता मध्यपूर्वेतील (इराण-इस्त्रायल) युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली गॅस टंचाई दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने व्यावसायिक एलपीजी पुरवठ्यात २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील हॉटेल्स, ढाबे आणि अन्न प्रक्रिया उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असून, वाढीव पुरवठा तत्काळ लागू करण्यात आला आहे.

**राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन आणि अन्न प्रक्रिया – दुग्ध व्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून केंद्र शासनाच्या निर्देशानुसार २० टक्के अतिरिक्त व्यापारी एलपीजी पुरवठा करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर होते. आता २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप वाढविण्यात आले असून एकूण गॅस पुरवठा पूर्व–संकट पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे.**

**– छगन भुजबळ**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**






# घुलेवाडी परिसरात आढळला मृतदेह

## नागरिकांमध्ये खळबळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - घुलेवाडी येथील साखर कारखाना परिसरात रविवारी सकाळी एक धक्कादायक घटना उघडकीस आली. अविनाश विलास देवकर (वय २६, रा. घुलेवाडी) यांचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी २२ मार्च सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास साखर कारखाना परिसरातून नेहमीप्रमाणे ये-जा करणाऱ्या काही नागरिकांना एक व्यक्ती संशयास्पद अवस्थेत पडलेली दिसली. सुरुवातीला संबंधित व्यक्ती बेशुद्ध असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. मात्र, नागरिकांनी जवळ जाऊन पाहणी केली असता ती व्यक्ती मृत असल्याचे स्पष्ट झाले.

घटनेची माहिती तात्काळ स्थानिक नागरिकांनी पोलिसांना दिली. माहिती मिळताच शहर पोलिस निरीक्षक समीर बारवकर व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली. त्यानंतर मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सुरू करण्यात आले. काही वेळातच मृत व्यक्तीची ओळख अविनाश विलास देवकर अशी पटली. ही माहिती मिळताच त्यांच्या कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. कुटुंबीयांचा आक्रोश पाहून नागरिकही हळहळले.

(पान २ वर)


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०


ताम्हाणे हॉस्पिटल
जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com




# संपादकीय...

## उन्हाळा आणि वणवे

## जळती वनसंपदा, वाढते संकट

उन्हाळा सुरू झाला की तापमानासोबतच आणखी एक संकट डोके वर काढते-जंगलांमध्ये लागणाऱ्या आगींचे. राज्यात सध्या ठिकठिकाणी वन खात्याच्या जंगलांना आग लागून वणवे पेटल्याच्या बातम्या सातत्याने समोर येत आहेत. काही ठिकाणी या आगी वेळीच आटोक्यात येतात, मात्र अनेकदा त्या नियंत्रणाबाहेर जाऊन रौद्र रूप धारण करतात. परिणामी, मोठ्या प्रमाणावर बहुमोल निसर्गसंपदा काही क्षणांत जळून खाक होते. अशा घटनांचे उदाहरण फार दूर नाही. काही वर्षांपूर्वी गोव्यातील महादयी वन्यजीव अभयारण्यात लागलेल्या भीषण आगीने संपूर्ण पश्चिम घाटाच्या जैवविविधतेवर मोठा आघात केला होता. जगातील महत्त्वाच्या जैवविविधता हॉटस्पॉटपैकी एक असलेल्या या परिसरात झालेल्या विध्वंसाची भरपाई आजही पूर्णपणे झालेली नाही. त्याचप्रमाणे, मागील वर्षी पुणे जिल्ह्यातील जंगलांमध्येही वणव्यांच्या अनेक घटना घडल्या आणि शेकडो एकर वनक्षेत्र नष्ट झाले. यंदाही अशाच घटनांची पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. वणवा म्हणजे केवळ आग नाही, तर तो निसर्गाच्या समतोलावर घाला असतो. वाळलेली पाने, गवत, लाकूड यांसारख्या ज्वलनशील घटकांमुळे ठिणगी लागली की आग क्षणार्धात पसरते. विशेषतः उन्हाळ्यातील कोरडे वातावरण आणि जोरदार वारे यामुळे ही आग अधिक भडकते. डोंगराळ आणि दुर्गम भागात तर अशा आगी विझवणे अधिकच कठीण ठरते. त्यामुळेच अनेकदा ही आग मोठ्या वणव्यात रूपांतरित होते. महत्त्वाची बाब म्हणजे, या आगी केवळ नैसर्गिक कारणांमुळेच लागतात असे नाही. उलट, मोठ्या प्रमाणावर या वणव्यांमागे मानवी हस्तक्षेप आढळतो. काही समाजकंटक जाणीवपूर्वक डोंगरावरील हिरवाई जाळतात, जेणेकरून नवीन गवत उगवेल आणि जनावरांसाठी चराई उपलब्ध होईल. तसेच, लाकूड, कोळसा मिळवण्यासाठी किंवा शेतीसाठी जमीन तयार करण्याच्या उद्देशानेही जंगलांना आग लावली जाते. ही प्रवृत्ती अत्यंत घातक असून दीर्घकालीन पर्यावरणीय संकटाला आमंत्रण देणारी आहे. या आगींमुळे केवळ झाडेच नाही, तर असंख्य वनस्पती, पक्षी आणि प्राणी यांचे अधिवास नष्ट होतात. अनेक वन्यजीव मृत्युमुखी पडतात किंवा स्थलांतरास भाग पाडले जातात. पर्यावरणातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढून जागतिक तापमानवाढीला चालना मिळते. या सर्वांचा परिणाम म्हणजे निसर्गाचे अपरिमित नुकसान, ज्याची भरपाई होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. दुसरीकडे, पावसाळ्यात मोठ्या उत्साहाने केले जाणारे वृक्षारोपणही या वणव्यांमुळे वाया जाते. विविध संस्था, शासन यंत्रणा आणि स्वयंसेवी संघटना मोठ्या प्रयत्नाने रोपे लावतात, त्यांचे संगोपन करतात. मात्र उन्हाळ्यात लागणाऱ्या आगींमुळे ही सर्व मेहनत काही क्षणांत नष्ट होते, हे अत्यंत दुर्दैवी आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाची भूमिका अधिक जबाबदारीची ठरते. मात्र वास्तव पाहता, अनेक ठिकाणी या मानवनिर्मित वणव्यांकडे दुर्लक्ष केले जाते. आगी लावणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई होताना दिसत नाही. काही ठिकाणी भ्रष्टाचार आणि निष्क्रियता यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनते. यासाठी आता ठोस पावले उचलण्याची गरज आहे. वणवे रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे, जनजागृती करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जाणीवपूर्वक आग लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. कारण जंगल म्हणजे केवळ झाडांचा समूह नाही, तर तो आपल्या पर्यावरणाचा, हवामानाचा आणि भविष्यातील जीवनाचा आधार आहे. म्हणूनच, वणव्यांवर नियंत्रण ठेवणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अन्यथा, आज जळणारी ही वनसंपदा उद्याच्या पिढ्यांसाठी कायमची हरवून जाईल.

# शिक्षणमहर्षी विद्यालयात गॅस सुरक्षा मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव दिघे - संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात एलपीजी पंचायत गॅस सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थी - विद्यार्थिनींना गॅस सुरक्षा मार्गदर्शन करण्यात आले.

तळेगाव दिघे येथील साईदिप एच. पी. गॅस ग्रामीण वितरक यांच्या सौजन्याने शिक्षणमहर्षी विद्यालयात विद्यार्थी - विद्यार्थिनींना गॅस वापरताना सुरक्षा कशी बाळगावी याबाबत गॅस वितरण अधिकारी वनिता वाघ यांनी मार्गदर्शन केले. संगी प्राचार्य प्राचार्य एच.आर. दिघे, उपमुख्याध्यापक एस. के. पर्यवेक्षक बी. सी. दिघे, सुनील घुले, बाबा जगताप, साईदिप एच. पी. गॅस एजन्सीचे संचालक गोपाळ लोळगे, सोमनाथ लोळगे, किरण गोडगे, फारूख शेख सहित शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते. गॅस वितरण अधिकारी वनिता वाघ यांनी विद्यार्थ्यांना गॅस सुरू असताना फॅन, दिवे, वीज प्रवाह बंद असावा. दरवाजे खिडक्या हवा जाण्यासाठी उघड्या असाव्यात. गॅस सुरक्षा नळी लिकेज नसल्याची खात्री करावी, गॅस रेगुलेटर नीट बसल्याची खात्री करावी, याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक गोपाळ लोळगे यांनी केले. सूत्रसंचालन सुनिल घुले यांनी केले. राम गायकवाड यांनी आभार मानले.

# कैलास भरीतकर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील सामाजिक कार्यकर्ते व भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते कैलास भरीतकर यांचे आज सोमवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ५२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने शहरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

कै. कैलास भरीतकर यांचा काही दिवसांपूर्वी अपघात झाला होता. त्यांच्यावर उपचार सुरू असताना सोमवारी पहाटे त्यांचे निधन झाले. ते भारतीय जनता पक्षाचे ओबीसी सेलचे शहर प्रमुख देखील होते. सामाजिक कार्यात देखील त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे. येथील अमरधाममध्ये दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. कैलास भरीतकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# सजग नागरिक ही ...

पान १ वरून - गैरव्यवहारांचा आणि भ्रष्टाचाराचा. भ्रष्टाचाराच्या रूपाने लागलेली कीड आणि जळवा नष्ट करण्यासाठी प्रत्येकानं निर्धार केला पाहिजे. प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतल्यास राष्ट्रीय आरोग्य सुदृढ राहील. जागतिक क्षितिजावर एक तंदुरुस्त व बलाढ्य राष्ट्र म्हणून आपल्याला अधिकाधिक नावलौकिक मिळेल' असे ते म्हणाले.

'प्रगत राष्ट्राच्या दृष्टीने आदर्श भारतीय शिक्षण प्रणाली कशी असली पाहिजे याचे मूर्तिमंत उदाहरण मला संगमनेरमध्ये ध्रुव ग्लोबल स्कूलच्या रूपात पाहायला मिळाले. येथील शिक्षण पद्धतीची इमारत भगवद्गीता आणि योग साधना यांच्या भक्कम पायावर उभी राहिलेली आहे. यातूनच आदर्श तंदुरुस्त राष्ट्रभक्त नवी पिढी आकार घेत आहे. ध्रुव ग्लोबल बघत असताना माझ्या आनंदाला खरोखर पारावार राहिला नाही. मालपाणी उद्योग समूह आणि डॉक्टर संजय मालपाणी यांच्या पुढाकारातून साकार झालेले आदर्श शिक्षण संकुल प्रत्येक शिक्षण संस्थेने अनुकरण करावे असेच आहे' असे गौरवोद्गार धर्माधिकारी यांनी काढले. दोन दिवस व्याख्यानाला संगमनेरच्या सुजाण श्रोत्यांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल धर्माधिकारी यांनी आभार मानले.

मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की संगमनेरमध्ये वेगवेगळ्या व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात. त्यामुळे अनेक पिढ्यांपासून संगमनेर मधली पिढी वैचारिक प्रगल्भ झालेली आहे. आमचे हे प्रयत्न सातत्याने चालू असतात. त्यामुळे संगमनेर एक आदर्श सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. या वैचारिक परीपक्कतेतून प्रगती चांगली होते. आपापसात सलोखा राहातो. इथे येणारी दिग्गज मंडळी त्यांच्या कार्यातून आणि अभ्यासातून त्यांच्या अनमोल ज्ञानाच्या आधारावर त्यांच्या एक दीड तासाच्या भाषणांमध्ये आपल्याला ज्ञानाचे भांडार देतात. म्हणून व्याख्यानमाला ऐकायला ही सं* गमनेरकर निश्चितपणे हजेरी लावतात.श्री. धर्माधिकारी यांनी दोन दिवस श्रोत्यांना राष्ट्रीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे अनमोल मार्गदर्शन करून नवीन दिशा दाखविल्याचे' नमूद केले. श्री धर्माधिकारी यांचा सत्कार मंडळाच्या वतीने अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी केला सूत्रसंचालन कार्याध्यक्ष सुमित अट्टल यांनी तर आभार प्रदर्शन मुरारी देशपांडे यांनी केले.

# घुलेवाडी परिसरात आढळला...

पान १ वरून -

या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला असून अहवालानंतर मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे. प्राथमिक तपासात कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नसली तरी पोलिसांकडून सर्व शक्यता गृहित धरून तपास सुरू आहे.

दरम्यान याबाबतच्या प्राथमिक तपासात सदर मयत तरूणाला कुठल्याही प्रकारची मारहाण झाल्याच्या जखमा त्याच्या शरीरावर आढळून आल्या नसल्याचे पोलीसांनी सांगितले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने नागरिकांना अफवा पसरवू नयेत व तपासात सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. पुढील तपासानंतरच या घटनेमागील सत्य समोर येणार आहे.

## अमृतसागर सह. दुध व्याव. व प्रक्रिया संघ मर्या अकोले, मु. पो. ता. अकोले, जि. अहिल्यानगर

### मिल्क पार्लर-चालवणेची निविदा-

या दुध संघाचे मुख्य कार्यालय अकोले येथील मिल्क पार्लर भाडे तत्वावर चालवणेसाठी दि. ०१/०४/२०२६ ते २८/०२/२०२७ या मुदतीची जाहिर निविदा ठराविक नमुन्यात सिलबंद पाकीटातुन मागविण्यात येत आहे.

मिल्क पार्लर चालविणेसाठी मासिक निविदा व निविदाबाबतची सविस्तर माहिती संघाचे कार्यालय-वाशेरे येथे कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल. तसेच यासाठी निविदा फॉर्म रु. ५००/- मात्र रोखीने मिळेल. (सुट्टीचा दिवस वगळून)

टिप- जाहिरात प्रसिध्दीपासुन ते दि. २७/०३/२०२६ वार शुक्रवार रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदा विक्री व स्विकृती केली जाईल. मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारले जाणार नाही.

कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे.

| श्री.दादाभाऊ गणपत सावंत | मा.श्री. रावसाहेब रामराव वाकचौरे | मा.आ.श्री. वैभवराव मधुकरराव पिचड |
|---|---|---|
| जनरल मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |


जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी
सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ — एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ — कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ — अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला- १ — सर्व घरकाम
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

त्वरित पाहिजेत
द्वारकादास शामकुमार
सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ १२ ते ९
9511238422

पाहिजेत
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मला, संगमनेर
9921245753

पाहिजेत
अमुल डेअरी मार्ट कुषी व्हेट दुध यंत्र तयार करणाऱ्या कंपनीसाठी
मार्केटिंग मॅनेजर- ५
ड्रायव्हर- २
टेलिकॉलर (महिला)- ३
हेल्पर - ५
7350628728

पाहिजेत
मार्केटिंगसाठी कॉम्प्यटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत
पोर्णिमा एजन्सी
नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर
7588607008
9890636830

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - 0१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - 0१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान 0१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

पाहिजेत
सेल्समन (महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

डेटा एंट्री ऑपरेटर पाहिजे
पात्रता: संगणक ज्ञान व MS Excel / Google Sheets मध्ये काम करता येणे आवश्यक.
अनुभव असल्यास प्राधान्य.
वेळ: सकाळी 9 ते संध्याकाळी 6
पगार: चर्चेनुसार / अनुभवाप्रमाणे
पत्ता: मे. एन. के. गाडे ऑफिस, पहिला मजला , गाडे बिल्डिंग, आशिर्वाद पतसंस्थेजवळ, शिवाजीनगर, संगमनेर
9822684402

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५




अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
MALPANI
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)



दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४



वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# संगमनेरचे सेवाभावी व्यक्तीमत्त्व डॉ. एस. जी. सातपुते यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## सेवाभावाचा आधारवड



## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

माणसाने प्रयत्न केले आणि जिद्द ठेवली तर तो परिस्थितीवर मात करून प्रगतीचे शिखर गाठू शकतो - हा विचार केवळ शब्दांत न राहता ज्यांनी आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यात कृतीतून सिद्ध केला अशा व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे कै. डॉ. सोमनाथ गंगाराम सातपुते. त्यांचे निधन ही केवळ एका व्यक्तीची हानी नसून, संगमनेरच्या सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रासाठी एक अपूरणीय नुकसान आहे. त्यांच्या जाण्याने एक आधारवड हरपला, एक प्रेरणास्थान हरपले आणि एक सदैव कार्यरत असलेले चैतन्य थांबले ही भावना सर्वांच्या मनात आहे.

डॉ. सातपुते यांचा जन्म अत्यंत साध्या आणि प्रतिकूल परिस्थितीत झाला. १५ जानेवारी १९४० ही त्यांची जन्मतारीख अंदाजाने नोंदली गेली पण त्यांच्या आयुष्याचा प्रभाव मात्र अचूक आणि ठळकपणे प्रत्येकाच्या मनावर कोरला गेला. सुकेवाडीसारख्या छोट्याशा गावात जिथे शिक्षणाच्या सुविधा नव्हत्या आणि मुलांनी शिकावे म्हणजे शेतीकामात अडथळा येतो अशी मानसिकता होती, अशा वातावरणात त्यांनी शिक्षणाची वाट धरली. लहानपणीच पितृछत्र हरपले, घरची जबाबदारी मोठ्या भावांवर आली. अशा परिस्थितीत मोठ्या बंधूंनी काबाडकष्ट करून कुटुंब चालवले आणि धाकट्या भावाच्या हट्टासाठी त्यांना डॉक्टर बनवण्याचा निर्णय घेतला. हा बंधूप्रेमाचा आदर्श त्यांच्या आयुष्याचा पाया ठरला.

अत्यंत बिकट परिस्थितीशी झुंज देत त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. नाशिक आणि पुणे येथे शिक्षण घेत असताना समाजातील गरिब-श्रीमंत दरी त्यांनी जवळून अनुभवली. या अनुभवांनी त्यांच्या मनात करुणा, संवेदनशीलता आणि समाजाबद्दलची जबाबदारी अधिक दृढ केली. त्यांनी एम.बी.बी.एस. पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षणाची संधी असूनही लगेचच वैद्यकीय व्यवसायात पदार्पण केले. हा निर्णय त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा होता. त्याची खंत त्यांना कधी कधी वाटत असेल, पण त्यांनी निवडलेला मार्ग मात्र हजारो लोकांच्या आयुष्यात प्रकाश पाडणारा ठरला.

२६ जानेवारी १९६७ रोजी त्यांनी आपल्या प्रॅक्टिसची सुरुवात केली आणि पुढील सुमारे ४३ वर्षे त्यांनी निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि सेवाभावाने वैद्यकीय व्यवसाय केला. १९६७ ते २०१० या कालावधीत त्यांनी असंख्य रुग्णांना केवळ औषधोपचारच दिले नाहीत तर त्यांना मानसिक आधार, आश्वासन आणि माणुसकीची ऊबही दिली. त्यांच्या मते, वैद्यकीय व्यवसाय हा एक श्रेष्ठ व्यवसाय आहे. सेवा हीच त्याची मूळ भावना आहे आणि पैसा हा दुय्यम भाग आहे. त्यांनी ही तत्वे आयुष्यभर जपली.

डॉक्टर म्हणजे देव नसतो आणि यमही नसतो, तोही एक माणूसच असतो - ही जाणीव त्यांनी नेहमीच ठेवली. रुग्णांशी वागताना त्यांनी माणुसकी, संयम आणि प्रामाणिकपणाचा आदर्श ठेवला. त्याचबरोबर रुग्णांनीही नियम पाळावेत याची जाणीव करून देत त्यांनी डॉक्टर-रुग्ण नातेसंबंध अधिक सुदृढ केले.

त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा कुटुंबीयांचा आधार. त्यांच्या पत्नी सौ. मंदा या त्यांच्या आयुष्याचा खंबीर आधारस्तंभ होत्या. त्यांनी निःस्वार्थपणे संसाराची जबाबदारी सांभाळली आणि मुलांवर उत्तम संस्कार केले. डॉ. सातपुते स्वतः व्यवसायात व्यस्त असताना मुलांच्या शिक्षणाची, शिस्तीची आणि प्रगतीची जबाबदारी त्यांनी अत्यंत समर्पणाने पार पाडली. त्यांचे हे योगदान अमूल्य आहे.

त्यांच्या तीनही मुलांनी वैद्यकीय क्षेत्रात यश मिळवले - डॉ. सचिन, डॉ. राहुल आणि डॉ. रणजित. सुना देखील डॉक्टर असल्याने त्यांच्या घरात जणू डॉक्टरांचेच विश्व निर्माण झाले होते. सातपुत्यांच्या घरात सात डॉक्टर ही बाब त्यांच्या आयुष्याची एक मोठी अभिमानास्पद गोष्ट होती. हे केवळ यश नसून, त्यांच्या कुटुंबातील संस्कार, मेहनत आणि मूल्यांचे प्रतीक आहे.

डॉ. सातपुते यांचे आयुष्य केवळ वैद्यकीय व्यवसायापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी समाजकार्यातही तितक्याच उत्साहाने सहभाग घेतला. संगमनेर शहरातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सहकारी संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. मराठा समाज विकास संस्था, ज्येष्ठ नागरिक संघ, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्था, मर्चंट बँक, पतसंस्था अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी कार्य केले. त्यांनी कोणत्याही पदाचा मोह न ठेवता केवळ समाजहितासाठी काम केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक विशेष गुण म्हणजे त्यांनी केलेल्या प्रत्येक कामाचे श्रेय इतरांना देण्याची वृत्ती. त्यांनी सहकाऱ्यांचे कौतुक केले, त्यांच्या गुणांना वाव दिला आणि प्रत्येकाला प्रोत्साहन दिले. त्यामुळेच ते अनेकांसाठी 'रोल मॉडेल' ठरले.

२०१० नंतर त्यांनी वैद्यकीय प्रॅक्टिस थांबवली, पण समाजसेवा मात्र अधिक जोमाने सुरू ठेवली. ज्येष्ठ नागरिक संघाच्या माध्यमातून त्यांनी अनेक उपक्रम राबवले. ज्येष्ठ नागरिकांना एकत्र आणणे, त्यांच्या समस्या ऐकणे, त्यांना मानसिक आधार देणे, आरोग्याविषयी मार्गदर्शन करणे या सर्व गोष्टी त्यांनी मनापासून केल्या. त्यांच्या सहली, संवाद आणि मार्गदर्शनामुळे अनेकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल झाले. त्यांना वाचनाचीही आवड होती. संगमनेर कॉलेजच्या लायब्ररीतील पुस्तके वाचून त्यांचे टिपण करणे हा त्यांचा आवडता छंद होता. इतिहास, समाज आणि जीवन याबद्दल त्यांनी सातत्याने चिंतन केले.

त्यांनी लिहिलेले 'स्टेथोस्कोप' हे पुस्तक त्यांच्या आयुष्याचा सार आहे. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले होते की, हा इतिहास नसून घटनांचा मागोवा आहे. कोणताही आडपडदा न ठेवता त्यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव मांडले. भावी पिढीने त्यातून प्रेरणा घ्यावी हा त्यांचा प्रामाणिक हेतू होता. एक मुलगा जरी या पुस्तकातून स्फूर्ती घेऊन यशस्वी झाला तरी मी धन्य समजेल - हा त्यांचा विचार त्यांच्या निस्वार्थ वृत्तीचा पुरावा आहे.

१५ मार्च २०२६ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने संगमनेर परिसरात शोककळा पसरली. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सहकारी, मित्र आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येकाच्या मनात एकच भावना होती - आपण एक महान व्यक्तिमत्त्व गमावले आहे. डॉ. सातपुते यांचे आयुष्य हे गरिबीकडून श्रीमंतीकडे नव्हे, तर गरिबीकडून समृद्धीकडे जाणारा प्रवास होता. त्यांनी केवळ स्वतःची प्रगती केली नाही तर समाजालाही उन्नत केले. त्यांनी दिलेले योगदान मोजता येणार नाही, कारण त्यांनी आपल्याकडे देण्यासारखे जे काही होते ते १००% दिले.

आज त्यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्या कार्याची उंची, त्यांच्या विचारांची खोली आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची भव्यता जाणवते. हिमालयासारखी उंची, चंद्रासारखी शीतलता आणि इंद्रधनुष्याच्या रंगांसारखी विविधता त्यांच्या आयुष्यात होती. त्यांच्या पश्चात त्यांचा मोठा परिवार आहे - तीन मुलगे, सुना आणि नातवंडे. पण त्यांचा खरा परिवार म्हणजे त्यांनी जोडलेली माणसे, त्यांनी स्पर्श केलेली आयुष्ये आणि त्यांनी निर्माण केलेली मूल्ये.

कै. डॉ. सोमनाथ सातपुते यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करताना एकच म्हणावेसे वाटते - त्यांचे कार्य, त्यांचे विचार आणि त्यांची प्रेरणा सदैव जिवंत राहील.

अशा महान व्यक्तिमत्त्वाचा जन्म होतो, तेव्हा समाज घडतो; आणि ते निघून जातात, तेव्हा इतिहास निर्माण होतो.

**किसन भाऊ हासे**
**संस्थापक, दैनिक युवावार्ता**
**संगमनेर**

# ग्रामीण भागातील पहिले एमबीबीएस डॉ. सोमनाथजी सातपुते

डॉ. सोमनाथ सातपुते आणि मी एकाच वेळेस शिक्षण घेत होतो. डॉक्टर शाळेत शिकत असताना प्रथम पासूनच हुशार विद्यार्थी होते. त्यांची खोली रंगार गल्लीत तर माझी खोली चंद्रशेखर चौकात होती. आम्ही दोघे अकरावी म्हणजे मॅट्रिक बरोबरच पास झालो. डॉक्टर नाशिक येथे इंटर सायन्सला गेले मी शिक्षक ट्रेनिक कॉलेज जामगाव ता. पारनेरला गेलो. आमची मैत्री मात्र कायम होती. इंटर सायन्स मध्ये चांगले मार्क मिळवून ते पास झाले. त्यांनी एम.बी.बी.एस. साठी पुण्याला फॉर्म भरला. ते सय्यद बाबा चौकात बाजाराच्या दिवशी कांदे विकत होते. त्याच ठिकाणी त्यांना एम. बी. बी. एस ला नंबर लागला अशी ऑर्डर मिळाली, मी पण प्रशिक्षित होऊन आलो होतो. आमची बाजारात भेट झाली त्यांनी मला सांगितले माझी पुणे येथे एमबीबीएस साठी निवड झाली. आम्ही एकमेकांना मिठी मारून आनंद व्यक्त केला. नंतर ते डॉक्टर झाले आणि संगमनेर नगरपालिका दवाखान्यात डॉ. पालवे यांच्या मार्गदर्शनात प्रॅक्टीस सुरू झाली. नंतर त्यांना मेन रोडवर लहानशी जागा मिळाली आणि त्या जागेत त्यांनी दवाखाना सुरू केला. त्याच वेळेस मी संगमनेर येथेच शाळा क्रमांक एकला शिक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यामुळे पुन्हा जवळ आलो. डॉक्टर व्यवसाय करत असताना ग्रामीण भागातील पेशंट त्यांच्याकडे यायचे, पैसे कमी असले तरी त्यांना मदत करायचे. कधी कधी करवा मेडिकल मधून औषध घेऊन द्यायचे. त्यावेळेस मोहन शेठ करवा आणि मदन शेठ करवा हे सुद्धा मदत करायचे. ग्रामीण भागात ते मोटार सायकलवर पेशन्टला उपचार करायला जायचे. नंतर त्यांनी जीप घेतली. एकदा त्यांच्याकडे कोल्हेवाडी येथील दिघे नावाचे शेतकरी आले होते, रात्र झाली होती, ते म्हणाले डॉ. आमची म्हातारी खूप आजारी आहे. तुम्ही माझ्या बरोबर चला. त्यांच्या बरोबर जीप घेऊन डॉक्टर गेले. घरी गेल्यानंतर घरात सांगितले चहा करा. डॉ.सातपुते आले आहेत. तेव्हा डॉक्टर म्हणाले अरे आई कुठे आहे? तेव्हा दिघे म्हणाले, माझ्याजवळ कांद्याचे जास्त पैसे होते मला भीती वाटत होती म्हणून मी तुम्हाला घेऊन आलो. तुमची फी घ्या. डॉक्टर हसले व म्हणाले, फी नको आणि घरी आले.

माझी आई आजारी पडली तर ती दुसऱ्या डॉक्टरचे औषध घेत नव्हती. ती म्हणायची सोमनाथ डॉक्टरला आण. डॉक्टरला मी सांगितले की, डॉक्टर लगेच कळसला माझ्याबरोबर यायचे. आईला इंजेक्शन द्यायचे, आई बरी व्हायची. नंतर मी सेवा निवृत्त झालो त्यांनीही डॉक्टरकी मुलांकडे सोपवून त्यांनी ज्येष्ठ नागरिक संघटना, मराठा विकास संस्था स्थापनेत सहभाग घेतला. त्या संस्थेचे ते अध्यक्ष होते तर युवावर्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे सरचिटणीस आहेत. मी कार्याध्यक्ष आहे. त्यामुळे मी त्यांना आमच्या भवनमध्ये मीटिंग घ्यायला हॉल दिला. मी संगमनेर तालुक्यातील शहरासह सर्व संघटनांचा संघ तयार केला व त्या संघटनेला संगमनेर येथील तालुका महासंघ असे नाव दिले. संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघाचा मी अध्यक्ष असल्यामुळे ते आमच्या कार्यकारणीत शेवटपर्यंत माझ्या बरोबर उपाध्यक्ष म्हणून काम पाहत होते. असे शेवटपर्यंत ते आमच्या बरोबर होते.


१० मार्च २०२६ रोजी डॉक्टर पेन्शन भवन मध्ये माझ्या कार्यालयात येऊन भेटून गेले. हीच आमची शेवटची भेट. १९५६ पासून आम्ही एकत्र होतो ते आजपर्यंत. त्यांची दुःखद बातमी ऐकली आणि माझ्या डोळ्यात नकळत पाणी आले. त्यांना ज्येष्ठ नागरिक महासंघ, संगमनेर तालुका पेन्शनर संघटना, मराठा समाज विकास संस्था, कळसकर गुरुजी प्रतिष्ठान, गुरुजी अभ्यासिका, कळसकर विद्यालय, मुलींचे आश्रम या सर्वांची भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन....

**सोमनाथ कळसकर (गुरुजी)**
**राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त**
**आदर्श शिक्षक, संगमनेर**



# संगमनेरचे प्रसिद्ध समाज सेवक डॉ. एस. जी. सातपुते साहेब यांना भावपूर्ण श्रद्धांजली



॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥


**श्री छत्रपती शिवाजी महाराज नागरी सह. पतसंस्था मर्या;**
संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर
सर्व सन्माननीय संचालक मंडळ, कर्मचारी वृंद

**सो. ता. कळसकर गुरुजी संचलित**
**गुरूजी अभ्यासिका**
इंदिरानगर, संगमनेर
जि. अहिल्यानगर

**संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघ, संगमनेर**
जिल्हा- अहिल्यानगर
अध्यक्ष- सो. ता. कळसकर गुरूजी (राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त)
कार्याध्यक्ष- मा. प्राचार्य, ज्ञानेश्वर गोंटे सर
उपाध्यक्ष - गणेश लालजी बाहेती, रत्नाकर पगारे, डॉ. जी. पी. शेख, सुभाषराव पोखरकर
सरचिटणीस- नंदकिशोर बेल्हेकर सर
सहचिटणीस- अशोकराव नवले
खजिनदार - सुरेशशेठ जाजू व कार्यकारणी

**श्री संगम ग्रा. बि. शे. नागरी सह. पतसंस्था मर्या. संगमनेर**
ता. संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर
चेअरमन, व्हा. चेअरमन, व्यवस्थापक सर्व संचालक, कर्मचारी वृंद, संगमनेर

**मराठा समाज विकास संस्था, संगमनेर**
ता. संगमनेर,
जिल्हा- अहिल्यानगर

**अहिल्यानगर मराठा नागरी सह. पतसंस्था मर्या. संगमनेर**
शाखा- संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर
चेअरमन, व्हा. चेअरमन, सरव्यवस्थापक, सर्व संचालक, कर्मचारी वृंद

**संगमनेर शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर**
ता. संगमनेर,
जिल्हा- अहिल्यानगर


**दि संगमनेर मर्चंट को. ऑफ बँक लि. संगमनेर**
ता. संगमनेर,
जिल्हा- अहिल्यानगर

**संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक सेवा संघ**
संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर
व्हा. चेअरमन,
व्यवस्थापक सर्व संचालक व सदस्य

**सह्याद्री बहूजन विद्या प्रसारक संस्था, संगमनेर**
ता. संगमनेर,
जिल्हा- अहिल्यानगर


**युवा उद्योग समुह**
युवा पॉलिप्रिंट ॲण्ड पॅकेजींग इंड.
दैनिक युवावार्ता
साप्ताहिक संगम संस्कृती

पॅनल देणे आहे




पॅनल देणे आहे






# रुपाली चाकणकर अंधश्रद्धेच्या बळी

## उत्कर्षा रूपवते यांची चाकणकरवर टिका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : राज्य महिला आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेत कार्य करताना केवळ पद धारण करणे पुरेसे नसून, त्या पदाशी निगडित नैतिकता आणि जबाबदारी जपणे अत्यावश्यक असते. महिलांना मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तींनी स्वतःच्या आचरणातून आदर्श निर्माण करणे अपेक्षित असते. मात्र, महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर असतानाही श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील मूलभूत फरक समजत नसेल, तर ते अत्यंत दुर्दैवी आहे, अशी तीव्र टीका माजी सदस्या तथा वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी केली आहे.



कॅप्टन अशोक खरात प्रकरणावर रविवारी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रतिक्रिया देताना रुपवते यांनी अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी नमूद केले की, कॅप्टन खरात यांच्या माध्यमातून शेकडो महिलांचे शोषण होत असल्याचे समोर आले असून, या प्रकरणाचे धागेदोरे थेट आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यापर्यंत पोहोचत असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, चाकणकर स्वतः खरात यांना 'माझे गुरु' म्हणत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. हाच गुरू भोंदूबाबा निघणार हे मात्र चाकणकर यांच्या लक्षातच आले नाही. स्वतःही अंधश्रद्धेच्या गर्केत सापडले आणि इतरानां घेऊन देखील डुबल्या.

यासोबतच, कॅप्टन खरात यांच्यासोबत अनेक राजकीय नेत्यांचे फोटो व्हायरल झाले असून, त्या सर्व नेत्यांचे खरात यांच्याशी नेमके काय संबंध होते, याबाबत स्पष्टता देणे आवश्यक असल्याचे रुपवते यांनी म्हटले. ही केवळ ओळख होती की त्यापलीकडे काही संबंध होते? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. रुपवते यांनी पुढे सांगितले की, कॅप्टन खरात यांच्या ट्रस्टमध्ये रुपाली चाकणकर या संचालिका म्हणून कार्यरत आहेत. अशा खासगी ट्रस्टच्या फलकावर सरकारी पदाचा उल्लेख करण्याची गरज काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित करत ही बाब गंभीर असल्याचे नमूद केले. या संपूर्ण प्रकरणामुळे केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर राज्य महिला आयोगाच्या प्रतिमेची आणि विश्वासार्हतेचीही कसोटी लागली असल्याचे रुपवते यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या प्रकरणात पारदर्शकता राखत सर्व संबंधितांनी आपली भूमिका स्पष्ट करणे गरजेचे असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

# 'साऊ'च्या प्रतिमा कुलकर्णी यांना स्नेहाधार गौरव पुरस्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - स्नेहालय अहिल्यानगर संचलित स्नेहाधार पुणे प्रकल्पातर्फे एकल महिलांसाठी कार्य करत असलेल्या अकोलेतील साऊ ट्रस्टच्या प्रतिमा कुलकर्णी यांना 'स्नेहाधार गौरव' पुरस्काराने पुणे येथील निवारा सभागृहात नुकतेच सन्मानित करण्यात आले.

पर्सिस्टंट फाउंडेशनच्या अध्यक्षा सोनाली देशपांडे यांच्या हस्ते प्रतिमा कुलकर्णी, मंगेशी मून यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्काराला उत्तर देताना कुलकर्णी यांनी हा पुरस्कार माझा एकटीचा नसून संकटाच्या काळात हिमतीने उभ्या राहिलेल्या एकल महिलांचा हा सन्मान आहे. आमच्या सोबत राज्यभर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आहे. एकल महिलांचे सर्वेक्षण शासन करत आहे. एकल महिलांसाठी शासकीय धोरण बनू पहात *आहे ही नक्कीच आशादायी गोष्ट आहे. या पुरस्काराने पुढील कार्यासाठी नक्कीच बळ मिळेल, अशी भावना त्यांनी केली.

या कार्यक्रमासाठी स्नेहालयचे गिराष कुलकर्णी, माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, सिस्कॉमचे राजेंद्र धारणकर, शशिकांत सातभाई, स्नेहाधारचे विश्वस्त मंडळ उपस्थित होते. यावेळी बोलतांना सोनाली देशपांडे व गिरीष कुलकर्णी यांनी एकल महिलांचा दुर्लक्षित प्रश्न या कामातून समाजाच्या पुढे आणून त्यांचे सक्षमीकरण करत आहेत, यासाठी हा सन्मान असल्याचे सांगितले. हा पुरस्कार एकल महिलांच्या कामासाठी दिल्यामुळे पुरस्कार स्वीकारताना पुण्यातील नाजमिन शेख या एकल महिलेला त्यांनी व्यासपीठावर सोबत नेले. कोरोनात पती आणि मुलगा गमावल्यानंतर डिप्रेशनमध्ये गेलेल्या नाजमिनला ७५ हजारांचे ब्युटी पार्लर लोकसहभागातून उभे करून दिले. त्या आज आत्मविश्वासाने उभ्या राहिल्या आहेत.

# भोंदू अशोक खरात व त्याचे राजकीय आश्रयदाते यांना शोधून त्यांना कठोर शिक्षा करा : माकप

संगमनेर - अशोक खरात या भोंदू बाबाने नाशिक येथे राज्यभरातील हजारो लोकांची आर्थिक व शारीरिक लूट केली आहे, मानसिक छळ केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती पाहता त्यात अनेक मोठे प्रभावशाली राजकीय नेते गुंतलेले दिसते आहे. अशा पार्श्वभूमीवर या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून यातील सर्व दोषींना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे.

कुणीही भोंदू बाबा एकट्याने इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांची फसवणूक करू शकत नाही. त्यामागे राज्यातील सत्ताधारी, राजकीय नेते, आणि प्रशासनातील काही घटक यांचा हात असण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत सत्य समोर यावे यासाठी, या प्रकरणाची उच्चस्तरीय, स्वतंत्र व कालबद्ध चौकशी करण्यात यावी. अशोक खरात यांच्याशी संबंधित सर्व मालमत्ता सरकारने ताब्यात घ्यावी.

या प्रकरणात कोणताही राजकीय नेता, अधिकारी किंवा प्रभावशाली व्यक्ती सहभागी आढळल्यास त्यांची नावे जाहीर करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. पीडित नागरिकांना तात्काळ न्याय आणि आर्थिक भरपाई देण्यासाठी विशेष यंत्रणा उभारावी. राज्यातील अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची कठोर अंमलबजावणी करून अशा प्रकारच्या घटनांना कायमचा आळा घालावा. कोणीही कायद्यापेक्षा मोठा नाही मग तो कितीही मोठा राजकारणी, अधिकारी किंवा सत्ताधारी घटक असो, या तत्वानुसार जे जे या भोंदूगिरीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष साथ देत होते त्या सर्वांवर कारवाई करावी. या प्रकरणात अनेक महिलांचे शोषण झालेले असल्याने सरकारने किंवा प्रशासनाने यात कोणत्याही प्रकारची ढिलाई होऊ देऊ नये. आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न कुणीही करू नये. असे झाल्यास माकप या विरोधात रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन उभारल्याशिवाय राहणार नाही. आज देशात आणि राज्यात अंधश्रद्धा, अज्ञान आणि धार्मिक अंधभक्ती यांचा वापर करून जनतेची लूट करण्याचे प्रकार वाढत आहेत. हे केवळ सामाजिक प्रश्न नाहीत, तर सत्ताधारी व्यवस्थेच्या अपयशाचे आणि संगनमताचे द्योतक आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक न्याय यांना तिलांजली देणाऱ्या या प्रवृत्तीविरोधात निर्णायक लढा उभारण्याची गरज आहे. माकप सर्व प्रगतिशील, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाहीवादी शक्तींना, अशा भोंदूगिरी आणि त्यामागील राजकीय-सामाजिक युतीच्या विरोधात एकत्र येण्याचे आवाहन डॉ. अजित नवले राज्य सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांनी केले आहे.

# अनिता शिवपालसिंह ठाकूर यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दैनिक 'प्रवरातीर'चे संस्थापक संपादक शिवपालसिंह ठाकूर यांच्या पत्नी व कार्यकारी संपादक धीरज ठाकूर यांच्या मातोश्री अनिता शिवपालसिंह ठाकूर (वय ५५) यांचे सोमवारी (२३ मार्च) पहाटे चार वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संगमनेर शहरासह माध्यम क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



कै. अनिता ठाकूर या गेल्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान सोमवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने ठाकूर परिवाराचा मुख्य आधार हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. श्रीमती अनिता ठाकूर या अत्यंत मनमिळावू, प्रेमळ आणि सात्विक स्वभावाच्या होत्या. 'प्रवरातीर' च्या जडणघडणीत आणि कौटुंबिक प्रवासात त्यांनी शिवपालसिंह ठाकूर यांना मोलाची साथ दिली.

त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच संगमनेर परिसरातील राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे. सोमवारी दुपारी यांच्या पार्थिवावर संगमनेर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कै. अनिता शिवपालसिंह ठाकूर यांना श्रद्धांजली वाहिली.

त्यांच्या पश्चात पती शिवपालसिंह ठाकूर, चिरंजीव तथा धीरज ठाकूर, सून, मुली, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25